महाराष्ट्र पोलीस

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल. बी. एस. मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/९३६/२०२३ दि. ०५/०९/२०२३

## "वाहतूक नियंत्रण अधिसुचना"

**ज्याअर्थी,** उल्हासनगर वाहतूक उप विभागाचे हद्दीमध्ये दिनांक ०६/०९/२०२३ ते दिनांक ०७/०९/२०२३ रोजी उल्हासनगर वाहतुक उपविभाग हददीत खासदार श्री श्रीकांत शिंदे कार्यालय समोर, गोल मैदान उल्हासनगर–१ याठिकाणी गोपाळकाला व दहीहंडी उत्सव चे आयोजन करण्यात येणार आहे. सदर कार्यक्रमाचे वेळी नागरिक मोठया प्रमाणात उपस्थित राहणार आहे. नमूद परिसरात वाहतुकीची कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी डॉ. विनयकुमार राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढील प्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे:–

**प्रवेश बंद व नो पार्किंग –** १) किशोर पॅटीस गोल मैदान मुख्यप्रवेशव्दार ते साधुवानी पुतळा चौक गोलमैदान उल्हासनगर–१ या मार्गावर सर्व प्रकारच्या वाहनांना तात्पुरत्या स्वरूपात **प्रवेश बंद व नो पार्किंग** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** अ) किशोर पॅटीस गोल मैदान कडुन येणारी वाहने साधुवानी पुतळा ते मधुबन चौक मार्गे येथुन इच्छित स्थळी जातील.
ब) मधुबन चौकाकडुन अल्फा मेडीकल कडे जाणारी वाहने ही उल्हासनगर १ कडे जाणा–या रस्त्याने इच्छीत स्थळी जातील.
क) किशोर पॅटीस मार्गे भगवती नवानी स्टेज कडे जाणारी वाहने ही ब्रम्हकुमारी आश्रम मार्गे इच्छित स्थळी जातील
ड) किशोर पॅटीस कडुन नेहरू चौक कडे जाणारी वाहने ही पटेल लॉ प्राईज मार्गे इच्छित स्थळी जातील

सदरची वाहतूक अधिसूचना ही दि. ०६/०९/२०२३ रोजी सकाळी १०:०० ते दिनांक ०७/०९/२०२३ रोजी पावेतो गोपाळकाला कार्यक्रम संपेपर्यत अंमलात राहील.

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसूचना ही पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

**( डॉ. विनयकुमार राठोड )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,
जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर**
मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग, कल्याण.
मा. जिल्हाधिकारी, ठाणे.
मा. आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका.

CS CamScanner

**प्रत कार्यवाहीसाठी :—**

उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, कल्याण

विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, कल्याण/विठ्ठलवाडी

पोलीस उपायुक्त, परिमंडळ—४, उल्हासनगर व विशेष शाखा, ठाणे

**प्रत:—** पोलीस उपायुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर

२/— सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**प्रत :—** समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे

२/— सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत :—** सपोआ उल्हासनगर वाहतूक उपविभाग/प्रभारी अधिकारी, उल्हासनगर, विठठलवाडी वाहतूक शाखा.

२/— म.न.पा. उल्हासनगर च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सुचना फलके लावून घ्यावीत.

CamScanner